# आकाशवाणी पुणे
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी ०६.०० वा.

**दिनांक – ०९/०२/२०२५** **वार – रविवार**

**परिसंवाद**

सशस्त्र सेनांसाठी पायाभूत सुविधांचा विकास आणि देखभालीसाठी शाश्वत पद्धतींचा अंगिकार आणि गतिमानता या विषयावर दोन दिवसांचा परिसंवाद पुण्यातील लष्करी अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित करण्यात आला. संमिश्र स्वरुपातील या परिसंवादात शिक्षण आणि उद्योगातील विषयतज्ज्ञ, मान्यवर व्याख्याते यांना आमंत्रित करण्यात आलं. लष्करी स्थानकांवर घन आणि द्रवरूप कचरा व्यवस्थापनासह पायाभूत सुविधांचा विकास आणि देखभालीसाठी नावीन्यपूर्ण आणि शाश्वत बांधकाम पद्धतींवर यामध्ये उहापोह करण्यात आला.

**आयुर्वेद महोत्सव**

राज्य आयुर्वेदिक पुनर्विक्रेता संघटनेद्वारे सुसंवाद स्वास्थ्य मंत्र अंतर्गत पुण्यात आयुर्वेद महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे डॉक्टर दिगंबर मोकाट यांना 'राष्ट्रीय औषधी वनस्पती उत्कृष्ट संशोधक पुरस्कार केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते देण्यात आला. डॉक्टर दिगंबर मोकाट यांनी २५ वर्षे औषधी वनस्पतींसंबंधी केलेलं संशोधन, संवर्धन, लागवड, उपयुक्तता, शिक्षण, संशोधन, विस्तार कार्य, जनजागृती आणि कामांची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**फळभाज्या**

गुलटेकडी इथल्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज राज्यासह कर्नाटक, गुजरात, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश या राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. आवक आणि मागणी टिकून असल्यानं बहुतांश फळभाज्यांचे भाव स्थिर आहेत.

**सूर्यनमस्कार**

पुणे लोकमान्य फेस्टिवल आणि मनो-वर्धन योग संस्थेद्वारे सूर्यनमस्कार स्पर्धेचं आयोजन 'अखंड सूर्यनमस्कार महायज्ञ' या अभियानाच्या अंतर्गत करण्यात आलं. गेली २७ वर्षे हे अभियान सुरू आहे. संस्थेच्या साधारण दीड हजार साधकांनी १०८ दिवसात २७ लाख सूर्यनमस्काराचा संकल्प' पूर्ण केला. महिला आणि पुरुष मिळून एकूण १२ गटात ही स्पर्धा पार पडली. प्रत्येक गटातल्या प्रथम तीन विजेत्या स्पर्धकांना सन्मान चिन्हानं गौरविण्यात आलं.

सूर्यनमस्काराचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या सांगलीच्या डॉक्टर हर्षला पटवर्धन यांना यंदाचा सूर्यदूत' पुरस्कार  देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. रुईया मूकबधिर शाळेच्या विद्यार्थ्यांचा या कार्यक्रमात विशेष सहभाग होता.

**वृक्षारोपण**

शिवसेनेचे मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिवसेनेचे उपनेते, मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना शाखा देहूगाव आणि वृक्षदायी प्रतिष्ठान यांच्या वतीनं वृक्षारोपण करण्यात आलं. देहू शहर मोठ्या प्रमाणात विस्तारत असल्यामुळं देहूचा नियोजनबद्ध विकास झाला पाहिजे. त्यासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याचं आवाहनही खासदार बारणे यांनी केलं.

**छात्र संसद**

सत्याच्या विचारधारेत संघर्ष भरपूर असला तरी या विचारधारेला धरुनच काम करावं, असं स्पष्ट मत नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडियाचे प्रभारी डॉक्टर कन्हैया कुमार यांनी पुण्यात व्यक्त केलं.

एमआयटी विश्वशांती विद्यापीठाच्या वतीनं आयोजित १४ व्या भारतीय छात्र संसदेच्या पहिल्या सत्रात 'भारतीय राजकारणाची विचारधारा डावीकडे, उजवीकडे की नजरेच्या बाहेर' या विषयावरील परिसंवादात ते आज बोलत होते. या परिसंवादात हिमाचल प्रदेश विधानसभेचे अध्यक्ष कुलदीपसिंह पठानिया प्रामुख्यानं उपस्थित होते. पठानिया म्हणाले की, आपल्याला इतिहासात रमून चालणार नाही. देशासाठी काय करायचं आहे, याचा विचार आपल्याला आता वर्तमानकाळात करायचा आहे. विद्यार्थी राजकारणात येण्यासाठी

इच्छुक असतील तर ही चांगली बाब आहे. भविष्यात लोकप्रतिनिधी होऊ शकले नाही, तरी देशासाठी आपल्याला चांगलं योगदान द्यायचं आहे, हा विचार नक्की करा असं आवाहन त्यांनी केलं.

**श्रद्धांजली**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत सहकार्यवाह धनंजय घाटे यांना पुण्यात एका सभेमध्ये श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यकर्ता हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कामाचा आधार आहे. म्हणूनच शताब्दी वर्षातही संघ वर्धिष्णू आहे. अशा देवदुर्लभ कार्यकर्त्यांच्या मांदियाळीत अग्रेसर असलेला धनंजय सारखा कार्यकर्ता आज हरपला आहे, अशी भावना जनकल्याण समितीचे प्रांत कार्यकारणी सदस्य विनायकराव डंबीर यांनी यावेळी व्यक्त केली. प्रांत कार्यवाह डॉ. प्रवीण दबडगाव, पुणे महानगराचे संघचालक रविंद्र वंजारवाडकर या वेळी उपस्थित होते.

**बुद्धिबळ**

आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू जोसेफ डिसूजा यांच्या स्मृतीप्रित्यर्थ पुणे जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या मान्यतेनं जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा सुरू आहे. यामध्ये पाचव्या फेरीअखेर पार्थ शिंदे, शौर्यराजे बगाडे, मितांश देशमुख, झिद निओ, पाच-दहा बारा आणि चौदा वर्षाखालील गटात पाच गुणांनी आघाडीवर आहे. स्पर्धेत एकंदर आठ फेऱ्या असून स्पर्धा स्विस लीग आणि साखळी पद्धतीनं होत आहे.

पुणे आणि परिसरात उद्या कमाल ३५ अंश तर किमान १६ अंश सेल्सियस तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ०६.०० वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.